एकमेकां साह्य करू । अवघे होऊ श्रीमंत ॥

**SATURDAY CLUB GLOBAL TRUST**

Regn. No. E-26480 (Mum)

www.scgt.org.in

May 2022 E-Magazine Issue 2

# SATURDAY CLUB TIMES




४०० चौरस फुट ते १०००० चौरस फुटांची

## ऑटोमेटेड फॅक्टरी

वाचा भागिरथी प्रोडक्ट्सच्या
प्रगतीचा प्रवास

# D'CARBONISING CENTER INDIA

**Let's take a small steps to Reduce Air-Pollution by doing De-Carbonising your vehicle.**

**About Us:**

At D'Carbonising Center we do Decarbonizing process of engines without opening the engine & also we are manufacturer of Decarbonising Machine. Decarbonising Process, in simple words, we clean all the black/bad carbon which is present inside the engine by Decarbonizing it, which leads to increase in engine life, performance & increase in engine pickup.

**Our Vision:**

Our vision is reduce Air-Pollution by doing De-Carbonising of vehicles & helping Indian Economy by saving fuel.



## BENIFITES OF D'CARBONISING PROCESS

- Increases Mileage
- Increases Life
- Increases Performance
- Smoother Engine
- Reduces Noise
- Reduces Smoke
- Engine Back to New Life



## Looking for Business Collaboration PAN INDIA & Global.

**+91 7021940977 | +91 9029585784**

Office: 15, Ajanta Sea Breeze, Near New Horizon Scholar School, Sector-14, Airoli, Navi Mumbai - 400708. | www.dcarbonisingcenter.com

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| Respected Trustees | 1 |
| Board of Directors | 2 |
| सॅटर्डे क्लबची माहिती | 3 |
| महागाई, मंदी सदृश्य परिस्थितीत उद्योजकांनी काय करावे ? - श्री. अशोकराव दुगाडे | 4 |
| सेक्रेटरी जनरल हयांच्या लेखणीतून | 6 |
| सी.जी.सी. मिटिंग वृत्तांत | 8 |
| प्रगतीच्या वेगवान वाटेवर, भागिरथी प्रॉडक्टस् | 11 |
| पॅराडाईज कॉर्पोरेशनने दिले ड्रीम्स सोसायटीला मल्टीस्पोर्टस टर्फ | 13 |
| कॉफी विथ दहिसर - चॅप्टरचा नाविन्यपूर्ण उपक्रम | 14 |
| चॅप्टर्सचे जबरदस्त कार्यक्रम | 16 |
| सॅटर्डे क्लबचे हिरे | 18 |
| ''आयुर्वेदाला'' पोषक ठरणारी ''ज्योतिष चिकित्सा'' | 20 |
| चॅप्टर्सच्या विलक्षण वार्ता | 23 |
| How to grow your business? | 24 |
| For HR Policies Manual | 25 |
| पैश्यांचा पाऊस | 26 |
| रिजनमधील महत्त्वपूर्ण घडामोडी | 27 |
| सुवर्ण पालवी | 28 |
| Meeting Schedule | 29 |
| सॅटर्डे क्लब मधील चॅप्टर्सची माहिती | 31 |
| सॅटर्डे क्लब मधील विविध सेल | 35 |



ई मॅगेझीन अंक २ MAY 2022

# SATURDAY CLUB TIMES MAGAZINE

| | | |
|---|---|---|
| संचालक | : | सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट |
| संस्थापक | : | कै. माधवराव भिडे |
| संपादक | : | उपेंद्र साळवी |
| संपादकीय मंडळ | : | रश्मी गोखले, दिनेश थोरात, राजेश चौधरी, विद्या गोगटे , अनिल जोशी |
| कार्यकारी मंडळ | : | माधवी हातवळणे, केतकी बंकापुरे, स्मिता पाटील, तेजस चव्हाण कौस्तुभ भंडारी, शिवकला मुदलियार, चंदन नाईक, शुभम कुंभार |



सॅटर्डे क्लबच्या अंकामध्ये प्रसिध्द झालेला मजकूर आणि फोटो यांचे कोणत्याही स्वरुपात पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे.

**- संपादक**



प्रकाशक : सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

**या अंकात लेख व जाहिरातींसाठी संपर्क साधा :**

**९६१९००७६०६**

**Email : scgttimes@gmail.com**

**खाजगी वितरणासाठी**

एकमेकां साह्य करू । अवघे होऊ श्रीमंत ।।

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# RESPECTED TRUSTEES




**Shri. Ashok V. Dugade**
Chairman & Managing Trustee
SCGT



**Shri. Pradeep M. Tamhane**
Managing Director
Wincoat Colours & Coatings Pvt. Ltd.



**Dr. Suresh Kashinath Haware**
Managing Director
Haware Builders & Developers



**Shri. Ravindra Prabhudesai**
Managing Director
Pitambari Products Pvt. Ltd.



**Dr. Ajit Marathe**
Managing Director
Nirman Realtors & Developers



**Shri. Vijay Paranjape**
Ex. Siemens,
Business Consultant

# BOARD OF DIRECTORS

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

एकमेकां साह्य करू । अवघे होऊ श्रीमंत ।।



**SHRI NARENDRA BAGADE**
Director
Pitambari Agro Tourism



**SHRI ATUL ATRE**
Founder
Laser Telesystems Pvt. Ltd.



**SHRI MILIND PATIL**
Founder
Denfab



**SHRI SANTOSH PATIL**
Director
UKs Resort



**SHRI SHAILENDRA THATTE**
Advocate
Shailendra Thatte & Associates



**SHRI CHHABIRAJ RANE**
Managing Director
Chhabi Electricals



**ER. SANGRAM LIMAYE**
Chairman
Sangramsiddhi Pvt. Ltd.

# सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in



सॅटर्डे क्लबची स्थापना भारतातील सुप्रसिध्द ब्रिज इंजिनिअर स्व. माधवराव भिडे यांची, त्यांनी सॅटर्डे क्लबची चळवळ २००० साली सुरु केली. महाराष्ट्रीयांनी उद्योगव्यवसायातून लक्ष्मीची उपासना करावी, एकमेकांना मदत करुन व्यवसायवृध्दी करावी. श्रीमंती हे उद्योजकाच्या प्रगतीचे प्रतिक आहे, त्यामुळे अधिकाधिक मूल्याधारीत आर्थिक प्रगतीसाठी आपण आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे.

सॅटर्डे क्लबची संकल्पना **''एकमेकां साह्य करु अवघे होऊ श्रीमंत''** या घोषवाक्यात प्रतित होते.

**सॅटर्डे क्लबच्या उद्दीष्टांबद्दल बोलायचे झाल्यास -**

- **परस्पर सहकार्यावर आधारीत महाराष्ट्रीयन व्यावसायिकांचे अर्थपूर्ण जाळे विणणे.**
- **नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी उत्तेजन देणे.**
- **श्रीमंत व एकसंघ महाराष्ट्रीयन व्यावसायिक समाजाची उभारणी करणे.**
- **महाराष्ट्रीयन समाजाची व्यावसायिकतेबद्दलची मानसिकता बदलणे**
- **सहसदस्यांच्या उत्पादन व सेवांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.**
- **सदस्यांनी एकमेकांना नियमित भेटणे.**
- **व्यावसायिक संधींची देवाणघेवाण करणे.**
- **सदस्यांच्या व्यावसायिक अडचणींवर मात करण्यासाठी सहकार्य करणे.**
- **सदस्यांना परस्पर फायद्याचे व्यावसायिक करार करण्यासाठी उद्युक्त करणे.**

अशी दमदार संकल्पना, संस्थापक स्व. भिडेसाहेबांचे कुशल व प्रभावी नेतृत्व आणि समर्पित कार्यकर्त्यांच्या प्रचंड योगदानातून अल्पावधीतच क्लबच्या सदस्यांमध्ये उत्पादक, व्यावसायिक, तंत्रज्ञ, सल्लागार व विविध सेवा पुरविणारे इ. चा समावेश झाला आहे. क्लबच्या कारभारावर विश्र्वस्त मंडळाची देखरेख असते. विश्वस्त मंडळाचे सभासद आहेत.

**श्री. अशोकजी दुगाडे - विश्वस्त आणि कार्यकारी संचालक**
**माजी कार्यकारी संचालक बँक ऑफ महाराष्ट्र आणि इंडियन ओव्हरसीज बँक**
**श्री. प्रदिपजी ताम्हाणे - विश्वस्त आणि व्यवस्थापकीय संचालक विनकोट कलर्स अँड कोटिंग्स प्रा. लि.**
**श्री. रविंद्रजी प्रभुदेसाई - विश्वस्त आणि अध्यक्ष पितांबरी प्रॉडक्ट्स् प्रा. लि.**
**डॉ. अजित मराठेजी - विश्वस्त आणि व्यवस्थापकिय संचालक निर्माण ग्रुप**
**डॉ. सुरेशजी हावरे - विश्वस्त आणि जेष्ठ अणुशास्त्रज्ञ व संचालक, हावरे बिल्डर्स**
**श्री. विजयजी परांजपे - विश्वस्त आणि माजी संचालक, सीमेन्स आणि बिझनेस कन्सलटन्ट**
**सेक्रेटरी जनलर श्री. विनीत बनसोडे - द ग्रॅफोलॉजी रिसर्च इन्स्टिटयूट**

या विश्र्वस्त मंडळाबरोबरच CGB व CGC चे सक्रिय सभासद, अशा स्वरुपात संघटनेची दमदार वाटचाल सुरु आहे. आता वेळ आहे येणाऱ्या संधीचा वेध घेण्याची आणि त्याचा उपयोग करुन आपला उद्योगधंदा वाढविण्याची, आपली कार्यकारीणी सभासदांच्या व्यवसायवृध्दीसाठी सतत प्रयत्नशील आहे. मित्रहो, बरेच काही करावयाचे आहे. आपली कार्यकारीणी या दृष्टीने काम करण्यासाठी कटीबध्द आहे. या उपक्रमात आपल्या सर्वांच्या सक्रिय पाठींब्याची गरज आहे. एकीची वज्रमुठ आपल्या सर्वांच्याच आर्थिक व व्यावसायिक उन्नतीसाठी निश्चितच उपकारक ठरेल.

**चला तर.....उद्योग व्यवसायाच्या वाढीतून धनवृध्दीचा दृढसंकल्प करुन त्यानुसार कामाला लागूया.**



# महागाई, मंदी सदृश्य परिस्थितीत उद्योजकांनी काय करावे ?

**- श्री. अशोकराव दुगाडे**

**नमस्कार उद्योजक मित्रहो,**

**कसे आहात सगळे..**

गेल्याच महिन्यात पुणे येथे आपली सी जी सी अर्थात सेंट्रल गव्हर्निंग कौन्सिलची मिटिंग पार पाडली. सेक्रेटरी जनरल श्री. विनीत बनसोडे आणि त्यांचे सहकारी श्रीकृष्ण पाटील आणि सुहास फडणीस यांनी पुढील दोन वर्षांचा त्यांचा रोड मॅप आपल्या सगळया चॅप्टर्स लीडर्स समोर मांडला. आपण खरोखरच ग्लोबल कसे होऊ शकतो ? आपल्या प्रत्येक मेंबर्सना बिजनेस कसा मिळू शकतो ? त्याचप्रमाणे एक टीम म्हणून आपली संस्था सतत अग्रेसर कशी राहील याचा अत्यंत खोलवर विचार नवीन टीमने केला आहे, आणि त्याचप्रमाणे काम करायला सुरुवातही केली आहे.

सर्व सेंट्रल, रिजनल आणि चॅप्टर लीडरशिप टीमचं मी मनापासुन अभिनंदन आणि कौतुक करतो.

मला सद्यपरिस्थितीत एका महत्वाच्या मुद्याकडे तुम्हा सर्वांचे लक्ष वेधून घ्यायचं आहे.

आपल्या सगळयांना माहितीच आहे की, रशिया युक्रेन युध्द सुरु होऊन तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ झाला आहे. आधी असं वाटत होतं की हे युध्द थोडयाच दिवसात संपून जाईल पण ते लवकर संपण्याची काही चिन्हे दिसत नाहीयेत. त्यामुळे युरोप मधून येणाऱ्या स्पेशालिटी केमिकल्स, फार्मा इन्ग्रेडियंट, सॉफ्टवेअर सपोर्ट यासारख्या अशा अनेक गोष्टींच्या पुरवठयावर परिणाम झाला आहे. कोविडच्या प्रकोपानंतर हळूहळू पूर्वपदावर येणाऱ्या आपल्या अर्थव्यवस्थेला पुन्हा एकदा खीळ बसतेय की काय अशी स्थिती निर्माण होताना दिसते आहे. युध्दामुळे महागाईचा आलेख चढताच आहे म्हणूनच एक उद्योजक म्हणून या सगळया गोष्टींचा आपल्या बिझनेस वर कमीत कमी परिणाम कसा होईल आणि मंदीतही आपल्याला संधी कशी साधता येईल याचा विचार करणं आवश्यक झाले आहे.

त्यामुळेच मी तुम्हाला असा सल्ला देईन की, सध्या खूप काही स्टॉक ठेवण्याच्या फंदात न पडता, जरुरी पुरताच माल खरेदी करा. आपली इन्व्हेंटरी कमीत कमी कशी राहील आणि आपलं कामही थांबणार नाही याची काळजी कशी घेता येईल हे आपण आता पाहिलं पाहिजे. मंदी येऊ घातली आहे हे स्पष्टपणे दिसत आहे. महागाई निर्देशांक चढाच आहे. रुपयाही डॉलरच्या तुलनेत घसरताना दिसतोय. क्रुड ऑइलच्या किमतीचे बजेट आजही आपल्या देशाने काळजी करावी असंच आहे. देशाच्या ऊर्जेची गरज भागवताना श्रीलंका आणि पाकिस्तान या आपल्या शेजारी देशांची काय अवस्था झाली आहे हे तुम्ही बातम्यांमधून पाहताच असाल, वाचतच असाल.

भारतीय अर्थव्यस्थेच्या दृष्टीने उद्योगधंद्यासाठी पावसाळा हा नेहमीच स्लॅक सीझन असतो. अशा स्थितीतही आपण जास्तीत जास्त सेल्स कसा करु शकू हे आपण पाहिले पाहिजे. आपल्या सध्याच्या व्यवसायाला पूरक अशा व्यवसायातून नवीन काही करता येईल का यावर जाणीवपूर्वक विचार करायला हवा. तसेच खूप मोठी गुंतवणूक सध्याच्या घडीला करणे हे धाडसाचं ठरेल. पावसाळयानंतर येणाऱ्या सुगीच्या दिवसांसाठी अर्थातच गणपती, नवरात्र उत्सव, दीपावली अशा काळात मोठी झेप घेण्यासाठी आपण कसे तयार राहू याचा आत्ताच विचार

आणि त्याचप्रमाणे तयारी करुन ठेवणे हे अत्यंत गरजेचे राहील.

३१ मार्चला आर्थिक वर्ष संपलं. त्यामुळे आता तुम्हा सगळयांच्याच बॅलन्स शीट तयार झाल्या असतील. सगळी आकडेवारी समोर असेल. आता आपण गेल्या आर्थिक वर्षाचे सिंहावलोकन केले पाहिजे. आपला बिजनेस मागच्या वर्षीच्या तुलनेत किती वाढला ? किती नवीन ग्राहक जोडले ? काही नवीन विभागांमध्ये आपण काम केले का ? विक्री वाढवण्यासाठी काही विशेष गोष्टी केल्या का ? आपल्या विक्री आणि नफ्याचा रेशो (प्रमाण) काय आहे ? आपला प्रशासकीय (ऍडमिनिस्ट्रेटिव्ह) कॉस्ट किती ? मनुष्यबळाची कॉस्ट किती आहे. असे कितीतरी इंडिकेटर तुमच्या समोर आले असतील. फक्त वेगवेगळे रेशो आणि आकडेवारीचे विश्लेषण एवढयावरच मर्यादित न राहता स्ट्रॅटेजींचे सिंहावलोकन आपण केले पाहिजे.

हे सगळे इंडिकेटर्स काढायचे कसे ? या इंडिकेटर्स मधून काय बोध घ्यायचा हे समजून घ्या आणि काही अडचणी असतील तर तज्ञ व्यक्तींचा सल्ला घ्या किंवा आपल्या नियमित मिटींगमध्ये तसा रेफरन्स तुम्ही मागू शकता.

देशाच्या संपत्तीचे निर्माते म्हणून तसेच आपल्या उद्योगांचे लीडर म्हणून आपण अशा परिस्थितीतून धडे घेतलेच पाहिजेत. चला तर मग...!! या मंदीच्या काळातही नवनवीन संधी शोधूया आणि एकमेकांचा हात धरुन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहूया.

एकमेंका साह्य करु, अवघे होऊ श्रीमंत।

**श्री. अशोक दुगाडे**

अध्यक्ष आणि कार्यकारी विश्वस्त, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट

❖❖❖






# सेक्रेटरी जनरल हयांच्या लेखणीतून
## - श्री. विनीत बनसोडे

मागच्या महिन्यात पुण्याला CGC अर्थातच Central Governing Council ची मीटिंग झाली. महाराष्ट्र भरातील सर्व चॅप्टरहेडस, सेल हेडस, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स, ट्रस्टी हया सर्वांसमोर मी आणि माझे सहकारी श्रीकृष्ण पाटील आणि सुहास फडणीस यांनी पुढील २ वर्षांसाठीचा रोडमॅप मांडला. सर्व लीडर्सनी तो उचलूनही धरला त्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार. आपण सर्वजण मिळून आपल्या स्वप्नातील सॅटर्डे क्लब उभा करु ही खात्री वाटते.

सॅटर्डे क्लबचा प्रत्येक मेंबर आपापल्या उद्योगाचं नेतृत्व करतो आहे. इथे प्रत्येक जण लीडरच आहे. त्याचंही नेतृत्व करायला सॅटर्डे क्लबमध्ये नव्या दमाची नेतृत्वाची फळी उभी राहतेय. आपल्याकडे बहुसंख्य उद्योजक हे पहिल्या पिढीतील उद्योजक आहेत. जवळपास सगळेच जण काही काळ नोकरी करुन स्वतःच्या व्यवसायात आले आहेत. आपण नोकरी करत असतांना एखाद्या वेळी असं नक्कीच वाटून गेलं असेल की आपला बॉस आपल्याला कामाला लावून मस्त आराम करतो. पण आता मात्र तुमच्या लक्षात आलं असेल की आपल्याला आपल्या उद्योगाचे लीडर म्हणून आपल्या कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त काम करावं लागतं. म्हणूनच स्वतःला लीड करतो तो लीडर अशी नवी व्याख्या मला सुचवावीशी वाटते.

तुम्हा सर्वांना मी एक प्रश्न विचारतो.

तुम्ही लीडर आहात की मॅनेजर... ?

The one who manages from available resources is called as Manager.

मॅनेजर फक्त दिलेलं काम करतो. लीडरचं काम मात्र भविष्याची चाहुल घेऊन त्याप्रमाणे काम करणे आणि तेही इतरांपेक्षा जास्त. म्हणूनच आता सॅटर्डे क्लबमध्ये वेगवेगळया लेव्हलला लीडरशीप घेतलेल्यांनी इतरांपेक्षा जास्त काम करण्याची जबाबदारी घेतली आहे. मीही माझ्या आधीच्या काळात चॅप्टरचा सेक्रेटरी, ट्रेनिंगहेड, उद्योगबोध, अश्वमेध, उद्योगजत्रा, एमडीपी, मेटरिंग यांचं आयोजन अशा वेगवेगळया जबाबदाऱ्या घेत गेलो. सुरुवातीला भयंकर त्रास झाला, कारण मला माझ्या कन्फर्ट झोनच्या बाहेर यावं लागलं. आणि मग हळूहळू त्यातील गंमत कळायला लागली. हया सर्व प्रवासात माझी व्यवसाय करण्याची समज, आर्थिक बाबी योग्य प्रकारे कशा सांभाळायच्या, मॅन मॅनेजमेंट, टाईम मॅनेजमेंट, निगोशिएशन स्किल्स अशा अनेक गोष्टीत प्रभुत्वता येत गेली आणि मी उद्योजक म्हणून तसंच माणूस म्हणून प्रगल्भ होत गेलो.

तुम्ही तुमच्या प्रयत्नाने आपल्या स्वतःच्या चॅप्टर मध्ये काय पॉझिटिव्ह बदल घडवून आणू शकता ? आपल्या सहउद्योजकांचं १० मिनिटांचे प्रेझेंटेशन चांगलं व्हावं म्हणून मदत करु शकता का ? आपल्याकडे चांगले मोठे

उद्योजक यावेत म्हणून काही करु शकता का? तुमच्या चॅप्टरचे असे कोणते चॅलेंजेस आहेत, त्यावर तुम्ही काम करु शकता? त्यासाठी चॅप्टरहेड असण्याचीच काही आवश्यकता नाही. पद असणं ही एका विशिष्ट काळासाठीची तात्पुरती व्यवस्था आहे, पण नेतृत्वाचे गुण अंगी बाणवणं ही लाईफटाईम गोष्ट आहे. तुम्ही इथे काहीतरी जबाबदारी स्वीकारलीत तर तुमचं MBA पेक्षा भारी शिक्षण होईल हे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो, इतका मोठा आणि वेगवेगळया प्रकारचा अनुभव इथे मिळतो. तुमची व्हॅल्यू जर १०० करोडची झाली तर तुमच्या उद्योगाची व्हॅल्यू १०० करोडची बनवता येईल.

म्हणूनच माझं तुम्हाला आग्रहाचं सागणं आहे की, आपल्याला जी शक्य असेल ती जबाबदारी घ्या कारण सॅटर्डे क्लबमध्ये जबाबदारी घेणं हे एखादा Leadership Training Program करण्यासारखं आहे. नेमके हेच स्किल्स आपल्याला आपला स्वतःचा व्यवसाय मोठा करण्यासाठी उपयोगी पडतील.


तुम्हा सर्वांना मोठ्ठा उद्योजक होण्यासाठी हार्दिक शुभेच्छा आणि आग्रहाचं आमंत्रण.

आपला

**विनीत बनसोडे**

**सेक्रेटरी जनरल**

❖❖❖



एकमेकां साह्य करू । अवघे होऊ श्रीमंत ।।

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# सी जी सी मीटिंग वृत्तांत












सी जी सी मीटिंग नंतर आपण एक वृत्तांत लेखन स्पर्धा घोषित केली होती
त्या स्पर्धेतील ३ विजेत्यांचे लेख इथे प्रसिद्ध करत आहोत

**प्रथम : अनिल जोशी (वाशी)**

**व्दितीय : विशेष वऱ्हाडी (मालाड २.०) ◆ तृतीय : मिना चौधरी (लेक सिटी)**

## स्वप्नी जे देखिले रात्री...

२५ एप्रिल २०२२ ची सकाळ..म्हटलं तर इतर सगळया दिवसांसारखीच. पण SCGT च्या चॅप्टर हेड्स आणि इतर लीडर्ससाठी मात्र ही सकाळ वेगळी होती. अध्यात्माची पाळंमुळं रुजलेल्या महाराष्ट्राला चक्क श्रीमंतीची स्वप्न दाखवणाऱ्या भिडे सरांच्या क्लबच्या नव्या नेतेमंडळींची पुढची पाऊलं काय असतील हे जाणून घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून माणसं पुण्यनगरीत येत होती.

आणि आनंदाची गोष्ट म्हणजे नेत्यांनी आपल्या दूरदर्शी विचारांनी एकालाही विन्मुख होऊन पाठवलं नाही.

व्हर्चुअल चॅप्टर्स, ई-कॉमर्स पोर्टल, ई-बुलेटिन, सोशल मिडिया प्रशिक्षण इत्यादी घोषणा म्हणजे मराठी उद्योजकांचा झालेला वैश्विक विस्तार आणि तंत्रज्ञानाने घेतलेली भरारी याचं भान ठेऊन उचललेली सुंदर पाऊलंच होती! भिडे चॅप्टर आणि भिडे पूल या घोषणा म्हणजे तर, आम्ही कितीही श्रीमंत झालो तरी सर आम्ही तुम्हांला विसरणं कदापि शक्य नाही ही सरांना घातलेली प्रेमळ सादच.

विचारांत आणि हृदयात श्रीमंती नसेल तर पैशाने येणारी श्रीमंती चिरकाल टिकत नाही. पण खडतर कामगिरीच्या बळावर यश साध्य केलेल्यांना विशेष ऍवॉर्डस देऊन, आम्ही कुठल्याच बाबतीत कमी श्रीमंत नाही हे SCGT ने सिध्दच केलं त्या दिवशी. वक्तशीर आणि शिस्तबध्द नियोजन, सुग्रास मिष्टान्नांनी सभासदांचं उदरभरण या झालेल्या गोष्टी तर SCGT साठी आता नित्याच्याच. विचारांचं सोनं घेऊन तर सभासद परतलेच पण त्याहूनही वाटतं की भिडे सर असते तर त्यांनी समर्थांच्याच ओळी म्हटल्या असत्या..

**स्वप्नी जे देखिले रात्री । ते ते तैसेचि होतसे ।**

**हिंडता फिरता गेलो । आनंदवनभुवनी ।।**

**- प्रोफेसर अनिल जोशी (चेअरमन - वाशी चॅप्टर)**

❖❖❖

It was wonderful CGC meeting in pune. Awsome experience and lot of take away from our trustees and BOD's.

Anchoring by Vaishali madam and Sujit sir was superb.

Organization from pune team bang on.

Venue and menu both are very very well managed by Ajay Shinde sir (Mulberry group of hotels)

Special recognition who really did fantastic and motivational things in business and in personal life was the best part of yesterdays event. Yamini Khairnar we all felt your story and you are a true hero. You have motivated all of us and we will motivate other with your motivation. Madhura you are true inspiration to all. In such a short span of time you have created history and inspired all the start ups as well as who are their in the business for a

longer time.
Ravindra Prabhudesai sir gave so much insights about how your vision should be with his own successful experience was eye opener. 3/100 (100 cr, 100 acres & 100 years) Atleast 2 things everyone should achieve in their lives.
Ashok Dugade sir as always energetic and gave right direction to all the new chapter heads.
Best and Best guidence by Ajit Marathe Sir सरळ, सोप्या आणि अगदी मर्मावर भाष्य करणारे वक्ते. त्यांना ऐकणं ही कालच्या CGC event ची पर्वणी A true SONAR.
BLUE PRINT BY Vinit sir, Suhas Sir, Shrikrishna sir
एवढे दिवस बगाडे सर, अशोक दुगाडे सर यांच्याकडून आपण विनीत सर, सुहास सर आणि श्रीकृष्ण सर यांच्याबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकल्या त्या काल प्रत्यक्षात ब्लूप्रिंट व्दारे आम्हाला बघायला मिळाल्या.
सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट येत्या पुढील दोन वर्षात जी भरारी घेणार आहे त्याचे आम्ही साक्षीदार असणार आहोत हेच आमचे भाग्य. सगळया board of directors, नवनिर्वाचित रिझनहेड, डेप्युटी रिझनहेड आणि सेल हेड यांचे मनःपूर्वक अभिनंदन
True Scgtian,
Vishesh Varhadi (www.digibaapp.com)
Malad 2.O Chapter, Mumbai Western Region

❖❖❖

**25th April : CGC 2022-24 Meeting at Pune.**
It was an excellent example of planning with execution from start to end. Huge efforts for superb arrangements by the Pune & PCMC Region team were clearly reflected in this power packed meeting. Listening to the Great sharings by all our respected Board of Trustees, Board of directors & Leadership team on one dias was itself a great experience! Inspiring thoughts by Mr.Bhavesh Bhatia of Sunrise Candles set the socio - corporate tone of the meeting. Excellent anchoring by Vaishali ma'am & Sujit sir kept us hooked to the meeting till end.Networking with a vast variety of entrepreneurs from all over Maharashtra was cherry on cake! Felicitation of SCGT Business Cell Heads & their Deputies introduced us to their area of expertise.
**Most importantly, the SCGT Growth blueprint laid by Shri. Vinit Bansode sir, Shri. Shrikrishna Patil sir & Shri. Suhas Phadnis sir is quite visionary. “सॅटर्डे क्लब कात टाकतोय"...it is indeed phenomenal!**
Special thanks to Mr. Vivek Bhande sir - Dy Region Head & Mr. Nitin Borse sir - Region Head, Thane Region for timely arrangements to reach the meeting venue. Thank you Saturday Club for this enriching experience. Looking forward to contribute more as a CST team of evershining Lake City Chapter,Thane Region.
Regards,
**Meena Chaudhari - 9833428251**
**Chairperson (SCGT Lake City chapter.)**

bhagirathi
Since 1990

## WE ARE LOOKING FOR

# SUPERSTOCKIST AND DISTRIBUTORS

## FOR

- PUNE
- GOA
- NASHIK
- SATARA
- KOLHAPUR
- SINDHUDURG




For Trade Related Enquiries Contact : 9987914515

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# प्रगतीच्या वेगवान वाटेवर, भागिरथी प्रॉडक्टस्


असे म्हटले जाते की ज्या घरातील स्त्री उद्योजक असते त्या घरावर नकळत व्यवसायाचे संस्कार घडतात. हयाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भागिरथी प्रॉडक्ट्सच्या संस्थापिका सौ. शरयू परब - वगळ. १ जानेवारी १९९० रोजी त्यांनी व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली ती त्यांच्या आईच्या नावाने. स्वतः दळलेली पिठं, बाथरुमला उपयोगी लिक्विड क्लिनर, गोळया हया त्या घरोघरी जाऊन विकत. सुरुवातीच्या काळात अनेक वेळा पदरी निराशा पडत असे पण कठोर परिश्रमाला पर्याय नाही व सदैव सकारात्मक विचार करत असल्याने व्यवसाय करण्याची त्यांची उर्मी तिळमात्र हि कमी झाली नाही. हळूहळू ग्राहकांचा त्यांच्या पीठाला मिळणारा प्रतिसाद वाढला आणि मग त्यांनी फक्त पीठ उत्पादन यावर पूर्ण लक्ष केंद्रित केले. विविध प्रकारची पीठे तयार करणे, त्याचबरोबर उत्पादनांची गुणवत्ता आणि ग्राहकांबरोबर असलेले नाते त्यांनी कसोशीने जपले आणि त्याच्याच जोरावर भागिरथी प्रॉडक्ट्सला लोकांचा विश्वास लाभू लागला आणि घौडदौड जोमाने सुरु झाली. व्यवसायाचा आवाका वाढत होता. उत्पादनांची मागणी वाढत होती हे सर्व उमजून त्यांचे पती श्री. अनिल वगळ यांनी नोकरीला रामराम ठोकला आणि ते बायकोबरोबर व्यवसायात सामिल झाले. मग खऱ्या अर्थाने भागिरथी प्रॉडक्ट्सची वाटचाल प्रगतीशील होऊ लागली आणि अपना बाजार, रिलायन्स, डी-मार्ट, टाटा सारख्या नामांकित सुपरमार्केटस मध्ये भागिरथी प्रॉडक्ट्सची वर्णी लागली.

शरयू - अनिल यांचा सुपुत्र अभिजीत २०१२ मध्ये मॅनेजमेंट स्टडीज अभ्यासक्रमात पदवीधर झाला. त्या नंतर कुठेही नोकरी न करता आपल्याच कंपनीमध्ये तो रुजू झाला. सुरुवतीला त्याने कंपनीच्या सर्व प्रक्रिया तसेच तंत्र समजून घेतले. अभिजीतने सर्वप्रथम आकर्षक पॅकेजिंग आणि उत्पादन वितरण सेवेवर काम सुरु केले त्यामुळेच उत्पादनाची मागणी जबरदस्त वाढली. मागणी पूर्ण करण्यासाठी ४०० चौ. फुटांच्या गाळयात सुरु केलेला व्यवसाय २०१५ मध्ये प्रशस्त अश्या २५०० चौ. फुटांच्या जागेत हलवण्याचा निर्णय झाला. हयामुळे उत्पादन क्षमता दररोज १५०० किलो वरुन ४००० किलो होणार होती. पण कधी कधी काही गोष्टी उद्योजक जसे ठरवतो तसे ते घडत नाही. हयाचाच प्रत्यय भागिरथी प्रॉडक्ट्सला आला. पीठ दळणाऱ्या मशिन्स सदोष निघाल्या, जिथे नवे युनिट सुरु केले तिथे वीज बरोबर मिळत नव्हती, त्यातच कुशल कामगारांची वानवा होऊ लागली. धंदयात धक्के लागणे हे क्रमप्राप्त असते पण त्यावेळी विचारपूर्वक जोखीम घेणे गरजेचे असते. अशीच जोखीम २०१९ मध्ये व्यवसथापनाने घेतली आणि नव्या जागेत फॅक्टरी हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. स्वतःकडील सर्व पुंजी कंपनी मध्ये टाकत प्लांट पूर्णपणे ऑटोमॅटिक केला. हा निर्णय मात्र कंपनीच्या चांगलाच पथ्यावर पडला. २०१९ मध्ये कंपनीचे उत्पादन प्रतिदिन ८००० किलो झाले आणि २०२२ मध्ये ४५००० किलो वर पोचले.

३० प्रकारची पिठं सध्या भागिरथी प्रॉडक्ट्स ने तयार केलेली आहेत आणि मुंबई, ठाणे व रायगडमधील जवळजवळ सर्वच प्रस्थापित सुपरमार्केटस् मध्ये ती पीठे उपलब्ध आहेत. आता ही उत्पादने नाशिक, पुणे, कोल्हापूर आणि कोकण तसेच गोवा राज्यात उपलब्ध करण्याचा कंपनीचा मनसुबा आहे. लवकरच फ्लिपकार्ट आणि ऍमेझॉन सारख्या लोकप्रिय ऑनलाईन मार्केटप्लेस मध्ये ते उपलब्ध होतील. देशाच्या कक्षा ओलांडून सिंगापूर, अमेरिका, युरोप, आखाती देश, जपान व आफ्रिका येथे निर्यात करण्याचा कंपनीचा मानस आहे. प्रतिदिन २५००० किलो माल विकण्याचा संकल्प व्यवस्थापनाने घेतला आहे. त्यासाठी भविष्यात मार्केटिंगचे योग्य धोरण ते अवलंबणार आहेत.

३ दशकांचा भागिरथी प्रॉडक्ट्सचा प्रवास आत कुठे प्रगतीच्या वाटेवर सुरु झाला आहे. लवकरच महाराष्ट्राच्या प्रत्येक घराघरात स्थान मिळवणे हे कंपनीचे लक्ष्य आहे.

❖❖❖









Extra High Voltage Transformer



Inverter Duty Transformer



Skid Mounted Solution



Pad Mounted Substaion




Trailer Mounted Substation



Cast Resin Transformer



Pad Mounted Substaion



Ester Oil Transformer

Corporate Office: Lodha Supremus-II, A-129, Road No.22, Wagale Estate, MIDC Thane (W) , +91 - 22 - 20811110
Unit 1 : R-457, MIDC, Rabale, Behind Pipeline Road, Thane Belapur Road, Navi Mumbai, +91 - 22 - 20872274 / 75 / 76
Unit 2 : E-32, Taloja, MIDC, Navi Mumbai 410208, +91 - 22 - 27401019

**Contact Us**
www.telawne.com
tpepl@telawne.com

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# पॅराडाईज कॉर्पोरेशनने दिले ड्रीम्स सोसायटीला मल्टीस्पोर्टस टर्फ



मुंबई सारख्या शहरी भागांमध्ये सध्या मैदानांची कमतरता भासत असल्यामुळे अनेक रहिवाशी सोसायटींमधील मुलांना खेळांमध्ये प्राविण्य मिळवता येत नाही. म्हणूनच आज अनेक सोसायटी आपल्या आवारातच टर्फ ची सोय करुन घेत आहेत. भांडुप पश्चिम येथील ड्रीम्स को. ऑप. हौसिंग सोसायटी ने सुध्दा संकुलनातील मुलांसाठी ४-५ खेळांसाठी टर्फ करण्याचे योजिले, मार्केटमधून निविदा मागवण्यात आल्या. ४-५ निविदा आल्या आणि प्रत्येक कंपनीने सोसायटीच्या कार्यकरी समिती समोर प्रेझेंटेशन केले. सर्व कंपन्यांचा अनुभव, त्यांचे ग्राहक त्यंची सेवा उत्तम होत्या पण त्यात पॅराडाईज फ्लोरिंगच्या श्री. उत्तम पाटील यांनी दिलेले प्रेझेंटेशन सर्वांना विशेष जाणवले ज्यात त्यांनी कश्याप्रकारे सोसायटीचे पैसे वाचू शकतात हयावर विशेष भर दिला. मुख्यत्वे त्यांनी सोसायटीचे जवळजवळ १० लाखांची बचत करुन दाखविली आणि कमिटीने त्यांना काम देण्यासाठी शिक्कामोर्तब केले.

हया कामात त्यांना क्रिकेट, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल आणि फुटबॉल साठी १२००० चौरस फुटांच्या जागेत फ्लोरिंग व टर्फ करायचे होते आणि त्यासाठी त्यांना १५ दिवसांचा कालावधी दिला गेला. श्री. उत्तम पाटील यांना असलेला दांडगा अनुभव, त्यांनी अगोदर केलेली अनेक मोठी कामे आणि त्यांची तेवढीच अनुभवी, कार्यकुशल टीम यांनी हा प्रोजेक्ट रात्रंदिवस काम करुन अवघ्या १२ दिवसांत नियोजनबध्द रीतीने पूर्ण करुन सोसायटी कमिटी ला आश्चर्याचा धक्का दिला.

हया संपूर्ण कामाची तारीफ करतांना ड्रीम्स सोसायटीचे रहिवाशी आणि सॅटर्डे क्लब एलिट चॅप्टर चे सभासद श्री. चंद्रहास रहाटे म्हणाले की कामाचे प्रेझेन्टेशन देण्यापासून आम्हांला हे जाणवले कि पॅराडाईज कॉर्पोरेशन कंपनीचा हया प्रोजेक्ट बाबतीतला दृष्टीकोन अत्यंत प्रोफेशनल होता. काम दर्जेदार तर झालेच पण मुख्य म्हणजे टर्फची फिनिशिंग अगदी लाजवाब झाली. आम्हांला अभिमान आहे कि मुंबई उपनगरात एका निवासी संकुलात सर्वात मोठे टर्फ हे आमचे आहे पण ते कुशलतेने उत्तम पाटील यांच्या पॅराडाईज कॉर्पोरेशनने करुन दिले. ड्रीम्स सोसायटी कमिटीचे सभासद श्री. प्रमोद खांडेकर म्हणाले कि सोसायटीच्या मोकळया जागेत टर्फ तयार करुन घेण्याचा अनुभव खूपच सुखद झाला तो पॅराडाईज कॉर्पोरेशन कंपनीमुळे. त्यांनी काम दिलेल्या वेळेच्या अगोदर पूर्ण केले आणि उत्तम यांनी त्यांच्या नावाला सार्थ असे उत्तम काम करुन दिले. मी आणि संपूर्ण ड्रीम्सची कार्यकारी समिती उत्तम पाटील हयांच्या पॅराडाईज कॉर्पोरेशनचे आभार मानतो.

पॅराडाईज कॉर्पोरेशन फ्लोरिंग हया क्षेत्रात मागील २५ वर्षे कार्यरत आहे. कार्पेट टाईल्स, वुडन फ्लोरिंग, लॉन्स आणि लँडस्केप, क्रिकेट टर्फ, व्हॉलीबॉल कोर्ट, हॅन्ड टफहेड कार्पेट्स, ग्रीन वॉल्स इ. कामे करुन देतात. ५०० चौरस फुटांपासून ५०००० चौरस फुटांपर्यंतची अनेक कामे त्यांनी यशस्वीपणे संपूर्ण देशभरात केलेली आहेत.
**अधिक माहितीसाठी आपण ८८७९७४३५२१ / ९८२०६४२७९८ संपर्क करु शकता.**



paradise
Corporation
TRANSFORM YOUR SPACES
WITH OUR UNIQUE
FLOORING
SOLUTIONS
CARPET TILES
WOOD FLOORINGS
LAWNS & LANDSCAPES
GREEN WALLS & CREEPERS
HAND TUFTED CARPETS
WINDOW BLINDS & FILMS
Basketball Court
Football Court
Cricket Turf
Volleyball Court
Plot No. 516, Sector-4, Near Rajinder Ashram,
Opp. Trimurti CHS, Ghansoli, Navi Mumbai - 400701.
Branch Offices at: Vijaypura (Karnataka), Dapodi - Pune
+91 88797 43521 / +91 9820 642798
uttam@paradisefw.in / paradisefw15@gmail.com

एकमेकां साह्य करु । अवघे होऊ श्रीमंत ।।

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# कॉफी विथ दहिसर चॅप्टरचा नाविन्यपूर्ण उपक्रम









साधारण दुसऱ्या लॉकडाऊन म्हणजे एप्रिल २०२१ या काळात पुन्हा सर्वजण घरी बसले होते. व्यवसायाला पुन्हा ब्रेक लागण्याची शक्यता निर्माण झालेली होती अशा अवस्थेमध्ये आपण काय करु शकतो याचा विचार आम्ही करत होतो. प्रामुख्याने आपल्या मेंबर्स शी कनेक्ट कसे राहायचे इतर चॅप्टर मधील मेंबर्स शी कनेक्ट कसे राहू शकतो, बिझनेस कसा वाढवू शकतो या अनुषंगाने विचार करत होतो. हा विचार करत असतानाच दहिसर चॅप्टरचे चेअरपर्सन अमोल कारेकर यांच्या संकल्पनेतून कॉफी विथ दहिसर हा आगळा वेगळा उपक्रम साकारला गेला या उपक्रमाची नुकतीच वर्षपूर्ती देखील झाली. अल्पावधीत या उपक्रमाने सॅटर्डे क्लबच्या राज्यभरातील विविध चॅप्टर्स मध्ये उल्लेखनिय असा लौकिक मिळवला.

हयांची माहिती देतांना चेअरपर्सन अमोल कारेकर म्हणाले, कॉफी विथ दहिसर चे पहिले सेशन ४ एप्रिल २०२१ रोजी झाले. त्यासाठी वेस्टर्न मुंबई रिजन हेड स्वर्गीय विश्वास वाडे सरांची परवानगी घेतली त्यानंतर झूम वर कॉफी विथ दहिसरची मिटिंग झाली. या संकल्पनेत दोन-तीन चॅप्टर मिळून वेस्टर्न मुंबई रिजन मधील मेंबर्सना सहभागी करुन घेत होतो. एप्रिल, मे, जून मध्ये २२ चॅप्टर्स हया उपक्रमात सहभागी झाले. याच काळात वाडे सरांनी देखील कार्यक्रमात सहभाग घेतला. तसेच प्रेझेंटेशन देखील मागून घेतले. तसेच त्यांनी वेळोवेळी आम्हाला सहकार्य देखील केले. त्यांनी इतर रीजनची परवानगी मिळवून दिली. बरोबर एक वर्षानी म्हणजे ४ मे २०२२ ला आम्ही कॉफी विथ दहिसर ची वर्षपूर्ती (एनिवर्सरी) साजरी केली. आणि हया वर्षपूर्ती कार्यक्रमासाठी कार्यकारी विश्वस्त श्री. अशोकराव दुगाडे सरांनी परवानगी दिली आणि महत्त्वाचे म्हणजे हया कार्यक्रमासाठी ते स्वतः उपस्थित राहिले.

वर्षभर सातत्याने सॅटर्डे क्लबमध्ये चालणारा हा एकमेव उपक्रम ठरला. हया कार्यक्रमासाठी श्री. सचिन कामठे यांनी देखील महत्त्वाची भूमिका पार पाडली.

### कॉफी विथ दहिसरचे फलित

लॉकडाऊच्या काळामध्ये वर्षभर चाललेल्या कॉफी विथ दहिसर साधारणपणे १२ सेशन केले. त्यात ६ रीजन तसेच २८ चॅप्टर्स आणि जवळपास २०० मेंबर्स सहभागी झाले. याचा परिणाम असा झाला की, खूप चांगल्या प्रकारचे रेफरन्स जनरेट झाले आणि त्याचा बिझनेस वाढीला सपोर्ट झाला. त्याचबरोबर डनडील देखील चांगल्या प्रकारे जनरेट झाली.

हया उपक्रमासाठी दहीसर चॅप्टरचे सर्व मेंबर्स, पदाधिकारी, इतर रिजन मधील क्लबचे सर्व सदस्य यांनी देखील सहभाग घेऊन आम्हांला प्रोत्साहन दिले. येणाऱ्या काळामध्ये उरलेले सर्व चॅप्टर्स म्हणजे ७३ चॅप्टर्स यात सहभागी करुन घ्यावे, त्यादृष्टीने चॅप्टरचे नियोजन सुरु झाले आहे.

❖❖❖



# KALPATARU GROUP

**Kalpataru consultant** is one of the leading Civil-Environmental Consultants based at various cities like Dombivli, Kolhapur and Sangli. Kalpataru consultant is an **Environmental, Civil Engineering, Architectural, Plumbing & Public Health Consultancy Firm.**

## We are expert at

- Waste Water Engineering & Consultancy Services. (STP & ETP)
- Water Treatment & Engineering - RO Softener.
- Environmental Impacts Assessment (EIA) & Environment Clearance. (EC)
- MPCB Consent to Establishment & Consent to Operate. (CTE & CTO)
- Air Pollution Control Service.
- Rainwater Harvesting Service.
- Turnkey Effluent Treatment System, AMC, Maintenance.
- Prefabricated Packaged Water & Waste Water Treatment System.
- Solid Waste Management.
- Personal Protective Equipment Trader.
- Environmental Monitoring Services.









## KALPATARU GROUP

1290, D Ward, Uttareshwar Peth, Kolhapur. 416002
Phone : +91 76204 10402, +91 96374 24802
Email : contact@kalpatarucons.com

**kalpatarucons.com**

**Branches : Kolhapur, Dombivli, Chakan.**

# चॅप्टरचे जबरदस्त कार्यक्रम






सातारा रिजन मधील वडुज चॅप्टर येथे दिनांक २३ मे २०२२ रोजी ग्रॅंड व्हिझिटर्स डे संपन्न झाला या मीटिंग साठी दहिवडी व वडुज या दोन ठिकाणी होर्डिंग्स लावले होते. याचा प्रभाव या परिसरात खूप चांगलाच पाहायला मिळाला. या मीटिंग साठी रिजन मधून ५१ मेंबर व ४९ व्हिझिटर्स मिळून एकूण १०० उद्योजक उपस्थित होते. डॉ. रविराज अहिरराव यांनी उपस्थित उद्योजकांना मार्गदर्शन केले.

डेप्युटी सेक्रेटरी श्री. सुहास फडणीस सरांनी सांगितलेली क्लब ची माहिती ही सर्व उद्योजकांना खूप प्रेरित करणारी ठरली. माजी रिजनल हेड श्री. केदार साखरे सरांचे गोष्टीतून व्यवसाय वाढ हा विषय खूप काही सांगून गेला.

त्याचबरोबर रिजनल हेड श्री. अजय शिंदे सर यांनी सातारा रीजन व त्यामधील चॅप्टर्स यांची माहिती दिली. रिजन मधील काही मेंबर्सनी त्यांच्या उत्पादनांचे स्टॉल्स सुध्दा या मीटिंगमध्ये लावले होते. वडूज चॅप्टर चेअरपर्सन सौ. आशा तुपे, सेक्रेटरी श्री. दिपक तुपे व ट्रेजरर सौ. मेघना पूनदिकर आणि वडूज चॅप्टरच्या सर्व टीमने खूप मेहनत घेऊन हा ग्रॅंड व्हिझिटर्स डे यशस्वी रित्या पार पाडला.

आलेल्या व्हिझिटर्स पैकी ३० व्हिझिटर्सचे मेंबर्स म्हणून नोंदणी करुन गोल्डन चॅप्टर करण्याचे टार्गेट वडूज टीमने हाती घेतले आहे.

❖❖❖



## संगमनेर चॅप्टरचा धमाका

आपल्या चौथ्या वर्धापनादिनाच्या मिटींगमध्ये संगमनेर चॅप्टरने कमाल केली. ३२ विझिटर्स आणि १२ नवीन मेंबर्सचा प्रवेश अशी दमदार कामगिरी त्यांनी केली. सदस्य महेश ढोले यांच्या क्रिस्पिको टेस्टी भेळ या उत्पादनाचे अनावरण देखील झाले. एक दोन नाही तर चक्क ५४ देशांमध्ये व्यवसाय करत असलेल्या श्री. मारुती कुलकर्णी यांची मुलाखत देखील हयावेळी झाली. हया ॲक्शन पॅक्ड मिटींग ची दखल अनेक दैनिक वर्तमानपत्रांनी घेतली.




**स्टार्टअप आणि इंक्युबॅशनच्या माध्यमातून नवउद्योजकांना लाभली सॅटर्डे क्लबची भक्कम साथ**

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, धुळे चॅप्टर, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या के सी सर आय एल आणि एस एस व्ही पी एस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एमबीए विभागातर्फे भावी अभियंते व नवउदयोजकांना 'स्टार्टअप आणि इंक्युबॅशन' या विषयावर महत्त्वाचे मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नवीन उदयोजकांकडे अनेक कल्पना असूनही व्यवसाय उभा करताना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड दयावं लागतं. म्हणूनच कोणत्या प्रकारचा व्यवसाय करायचा, रिसर्च कसा केला पाहिजे, त्याचे रुपांतर प्रॉडक्ट मध्ये कसे करायचे, त्यासाठी आवश्यक असणारे भांडवल, तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे, वित्त अशा महत्त्वपूर्ण विषयांवर विस्तृत माहिती देण्यात आली.

उदयोजकांना भेडसावणाऱ्या या प्रश्नांची उत्तरं विद्यापिठात सुरु झालेल्या इन्क्युबेशन सेलच्या माध्यमातून मिळू शकतात तसेच स्टार्टअप साठी काही राखीव निधी सुध्दा असतो. म्हणूनच व्यावसायिक आणि विद्यापीठ यांना एक प्लॅटफॉर्म आणण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन सॅटर्डे क्लब ने पुढाकार घेऊन केले. यामुळे स्टार्ट विषयीची महत्त्वपुर्ण माहिती उदयोजकांना मिळाली आणि याचेच फलित म्हणजे आपण व्यवसाय कसा उभा केला पाहिजे आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांचा विचार करुन व्यवसाय वृध्दी कशी केली पाहिजे, याविषयी निश्चितच एक दिशा मिळाली.

उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी के सी सी आय एल चे सदस्य प्रा. भूषण चौधरी, डॉ. विकास गीते, प्रा. सिंग व प्रा. निखील कुलकर्णी उपस्थित होते. तसेच सॅटर्डे क्लब चे डेप्युटी रीजनल हेड श्री. नितिन पाटील, सीए श्रीराम देशपांडे, सीए राजाराम कुलकर्णी, श्री. अक्षय सावजी, प्राचार्य डॉ. एच पी पवार, श्री. संजय देसले, एमबीए विभाग प्रमुख प्रा. डॉ. महेद्रसिंग राठोड आदि व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. जितेश पाठक यांनी आणि आभार प्रदर्शन श्री. अहिरराव यांनी केले.

एकमेंका साह्य करु, अवघे होवू श्रीमंत - हे क्लबचे फक्त ब्रीद वाक्य नसून क्लब ने घेतलेला ध्यास आहे आणि त्याच अनुषंगाने सॅटर्डे क्लब अविरतपणे काम करत आहे.

❖❖❖




*Best Compliments*
*from*

**PRAJAKT MEHTA**
**9225110805**

MEHTA

# METAFORGE
Engineering (I) Pvt. Ltd.

**RESHAPING METALS WITH INNOVATIVE SOLUTIONS**

Manufacturers of cold forged parts, machined parts and
fasteners for automotive, electrical, construction industries.

**S.No. 22/3, Nasik - Dindori Road, Mhasrul, Nasik - 422004, Maharashtra INDIA**
**0253 - 2530 505 / 2530506 ; Website: www.metaforgeindia.com**
**mktg@metaforgeindia.com ; prajakt@metaforgeindia.com**

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# सॅटर्डे क्लबचे हिरे

## बी.ओ.डी. सदस्य इंजि. संग्राम लिमये ''इंजीनियरिंग अचीवमेंट अवॉर्ड'' ने सन्मानित



राष्ट्रीय स्तरावरील अग्रगण्य आणि नामांकित संस्था दि इन्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) यांच्या नाशिक लोकल सेंटर तर्फे वार्षिक पुरस्कार सोहळा दिनांक २९ एप्रिल २०२२ रोजी हॉटेल गेट वे येथे संपन्न झाला. यात आपल्या क्लबचे बी.ओ.डी. सदस्य इंजि. संग्राम लिमये यांना इंजीनियरींग अचीवमेंट अवॉर्ड या सन्मानाने गौरवण्यात आले. या कार्यक्रमाला उद्योग विश्वातील अनेक मान्यवर व्यक्तींची विशेष उपस्थिती होती. श्री. लिमये यांनी हा पुरस्कार त्यांच्या परीवाराला आणि व्यवसायातील सहकाऱ्यांना समर्पित केला.





## आंतरराष्ट्रीय तायक्वांदो चॅम्पियनशिप स्पर्धेत श्री. प्रणय मुल्की यांचे यश

चेंबूर चॅप्टरचे सदस्य श्री. प्रणय मुल्की यांची कोरिया येथील आंतरराष्ट्रीय तायक्वांदो चॅम्पियनशिपसाठी निवड झाली. या स्पर्धेत त्यांनी उत्तम कामगिरी करत २० वे स्थान पटकावले. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी चेंबूर आणि क्रॉस चॅप्टर सदस्यांचे त्यांना सहकार्य लाभले.

## जपान देशावर मराठी चित्रपट : श्री मनोहर परब यांची उल्लेखनीय कामगिरी !



आदरणीय श्री. भिडे सरांप्रमाणे आपल्या वयाची तमा न बाळगता वाशी चॅप्टरचे सदस्य श्री. मनोहर परब काम करीत असतात. प्रत्यके चांगली गोष्ट आपल्या सदस्यांपर्यंत पोहोचावी यासाठी धडपडतात. जपान देशातील चांगल्या गोष्टी महाराष्ट्रातील प्रत्येकाकडे पोहोचाव्यात यासाठी स्वतः जपानला जाऊन त्या देशावर चक्क मराठी चित्रपट काढला! आनंदाची गोष्ट म्हणजे हा चित्रपट नुकताच महाराष्ट्रातील १३ सिनेमागृहांत प्रदर्शित झाला. लाखो रुपये खर्च करुन जपान बघण्याऐवजी नाममात्र तिकीटदरात जपान बघण्याची सुवर्णसंधी श्री. परब यांच्यामुळे उपलब्ध झाली. श्री. मनोहर परब यांचे क्लबतर्फे हार्दिक अभिनंदन!




## एव्हकॉर्न कंट्रोल्सच्या सौ. मनिषा दाभोळकर यांचा महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान

मालाड २.० क्लबच्या सदस्या आणि एव्हकॉर्न कंट्रोल्सच्या प्रा. लि. चा संयुक्त व्यवस्थापकीय संचालिका सौ. मनिषा दाभोळकर यांना नुकतेच महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. टाईम्स इंटरॅक्ट आयोजित आणि महाराष्ट टाइम्स प्रायोजिक हा भव्य कार्यक्रम हॉटेल फोर सीझन, वरळी येथे पार पडला. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री मा. श्री. सुभाष देसाई आणि मराठी चित्रपट सृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेते श्री. सिद्धार्थ जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



## अकोला चॅप्टरचे सेक्रेटरी डॉ. महेश मुंदडा हे सामाजिक कार्यासाठी सन्मानित



St. Mother Theresa University
for
Digital Education Excellence and Sustainability Development and World Peace
Accredited by World Sign JBR HARVARD, USA
Affiliated to Cambridge School of Distance Education, UK
The Evaluation Board of Education Standard Accreditation Council
On the recommendation of the Faculty and by virtue of
the Authority vested in them have conferred on
Mr. Mahesh Rameshji Mundada
Having successfully completed the requirements and therefore
He is awarded
Honorary Doctorate
(Honoris Causa) in
Agri-Business Management
With the rights and privileges there unto appertaining on the
" Twenty-Eighth April Twenty Twenty Two @ Mumbai, INDIA"

WORLD SIGN ACCREDITED
J&B Registrars HARVARD
IAO

Prof. James Francis Kerr
Vice-Chancellor SMTU
AUSTRALIA

Dr. R.Vijaya Saraswathy
Founder President &
Pro- Vice Chancellor SMTU



आपल्या अकोला चॅप्टरचे सेक्रेटरी डॉ. महेश मुंदडा यांना सामाजिक कार्यासाठी २०२२ या वर्षीचा नेल्सन मंडेला नोबल पीस पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हॉटेल सहारा स्टार, मुंबई येथे श्री. प्रल्हादजी दामोदरदास मोदी, छत्रपती संभाजी महाराज यांचे वंशज, महाराजा हरी सिंग (जम्मू काश्मीर), दुबई रॉयल फॅमिली, अमीषा पटेल, अनुराधा पौडवाल, गुलशन ग्रोवर, वैषाली सामंत, मिसेस इंडिया युनिव्हर्स, सिंगापूर, यू.के., यू.एस., कॅनडा आणि इतर अनेक देशांतील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा पार पडला.

श्री महेश मुंदडा यांना सेंट मदर थेरसा युनिव्हर्सिटी, ऑस्ट्रेलिया यांच्यातर्फे ॲग्री-बिझनेस मॅनेजमेंट या विषयात मानद डॉक्टरेट ही पदवी प्रदान करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन!

KITCHEN TREATS
Fine Dining Products

YOUR KITCHEN PARTNER



■ 100% PURE MELAMINE FINE DINNING PRODUCTS
■ FDA APPROVED ■ NASA CERTIFIED
■ MICROWAVE DISHWASHER SAFE

ektra® by Superware
100% Melamine Tableware

BOOK YOUR ORDER TODAY
CONTACT: +91 98195 54188

# EXERTION HR SOLUTIONS PVT. LTD.

Empowering India for Employability

Your Compliance Partner




**Registrations Under All Labour Law**
- ❖ Shop & Establishment
- ❖ PF, ESIC, MLWF & PT
- ❖ Factory License
- ❖ Labour Contract License
- ❖ BOCW License



**Statutory & Labour Law Compliances**
- ❖ PF & ESIC Compliance
- ❖ Professional Tax
- ❖ Statutory Audit
- ❖ PF Inspection
- ❖ Show cause notices
- ❖ like 7A in PF & ADHOC C 18 in ESIC




**Payroll Management**
- ❖ Payroll Processing
- ❖ Salary Structure Creation
- ❖ Prepare Form 16 (Including Part A&B)
- ❖ MIS Report
- ❖ Salary Register
- ❖ PF, ESI & PT Reports
- ❖ Leave Balances, Accruals & Utilization
- ❖ Web based Solution

**Contract Staffing (Benefits)**
- ❖ Candidates for all business sectors
- ❖ Meet your seasonal needs
- ❖ No long hiring process
- ❖ Keeps resources cost low
- ❖ Skilled resources with long-term potential
- ❖ No long-term commitment
- ❖ Convert permanent hire on your discretion
- ❖ Access skilled resource rapidly
- ❖ Stay agile & flexible
- ❖ Easily respond to fluctuating workload.

**Permanent Recruitment**
- ❖ Our Primary Service
- ❖ Requisition Request Sent
- ❖ Source Passive And Active Candidates
- ❖ Phone Screen Potential Candidates
- ❖ Develop a Candidate Profile And Submit To Client
- ❖ In Person Interview



**REGISTERED OFFICE**

Pune: Kumbare Brothers, Near Sidhivinayak Temple, Azad Nagar, Kothrud, Pune – 411038.

**CORPORATE OFFICE**

Mumbai: 507 Office, Swastik Disha Corporate Park, Opp. Shreyas Cinema, Ghatkopar (W), Mumbai - 400086.

GAYATRI CHAVAN: 8599946333 | JAY SHAH: 9167121333

SATURDAY CLUB GLOBAL TRUST
Regn. No. E-26480 (Mum)
www.scgt.org.in

# ''आयुर्वेदाला '' पोषक ठरणारी ''ज्योतिष चिकित्सा''

ज्योतिष शास्त्री नीना चौराशे - मालाड चॅप्टर

प्राचिन वेदांमधून उत्पत्तीस आलेले वेदांग ''ज्योतिषचिकित्सा'' आणि ''आयुर्वेद'' ह्यांचा परस्पर सहसंबध पाहू. परंपरेने ज्योतिषचिकित्सा **(Medical Astrology) "Latromathematics"** म्हणून ओळखली जाते. ही ज्योतिषचिकित्सा प्राचीन वेदांमधूनच उगम पावलेली असून त्यातून गीतेचा सार आणि प्राचीन वैदिक विज्ञानाचीही प्रचिती येते. ज्योतिष चिकित्सकीय मार्गदर्शनामुळे वैद्यकिय इतिहासात अक्षरक्षः अचूक आणि चमत्कारीक परिणाम पहायला मिळतात. हया लेखाव्दारे जास्तीत जास्त लोकांना जागृत करण्यासाठी हया विषयाची विस्तृत माहिती देण्यात आली आहे. जेणे करुन सर्व सामान्यांना हया गोष्टींचा लाभ घेता यावा.

ज्योतिषचिकित्सेमुळे एखादयाच्या कुंडलीवरुन अचूक रोगाचे निदान करणे तर शक्य आहेच, त्या व्यतिरिक्त एखादया जातकाला कोणत्या प्रकारच्या आरोग्याच्या तक्रारींना सामोरे जावे लागू शकते हेही आपण जाणून घेऊ शकतो. त्याचप्रमाणे होणारा आरोग्याचा त्रास कशामुळे आहे आणि तो कसा टाळताही येऊ शकतो किंवा त्वरीत उपाय ही जाणून घेऊ शकतो.

